# महाराष्ट्र विधानसभा निवडणूक 2014 साठी
# एडीआर-दक्ष यांनी केलेल्या सर्वेक्षणातील निष्कर्ष

द असोशिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडरआर) आणि दक्ष यांनी राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक सर्वेक्षण केले. यामध्ये 288 मतदार संघातील 20 हजार लोकांपर्यंत पोहचून त्यांच्याकडून विविध अपेक्षा जाणून घेतल्या. या सर्वेक्षणात मतदारांनी विविध समस्यांवर सरकारला त्यांच्या कामांसाठी गुण दिले आहेत. यातून गेल्या पाच वर्षांमध्ये सरकारने केलेल्या कामाचा उहापोह करण्यात आला आहे.

मतदारांच्या गरजा काय आहेत हे जाणून घेणे हा या सर्वेक्षणामागचा मुख्य उद्देश होता. मतदारांच्या या गरजांबाबत राजकीय पक्षांनी त्यांच्या जाहीरनाम्यात उल्लेख करावा अशी अपेक्षा यातून व्यक्त करण्यात आली आहे. राजकीय पक्षांच्या जाहिरनाम्यापेक्षा मतदारांना काय हवे आहे यावर निवडणूकीच्या काळात चर्चा होणे अपेक्षित आहे. तसेच भविष्यात सत्तेवर येणारे सरकार मतदरांच्या गजांचा विचार करून त्यांची कामाची दिशा ठरवेल.

**सर्वेक्षणाचे मुल्यमापन करताना लक्षात घेतलेले प्रमुख मुद्दे**

- मतदारांच्या महत्त्वाच्या अपेक्षा आणि गरजा जाणून घेणे.
- समजारातील महत्त्वाच्या घटकांकडून प्राधान्याचे मुद्दे जाणून घेणे.
- मतदार संघ आणि जिल्हानिहाय सरकारच्या कामाचे मुल्यांकन
- तळागाळातील समस्यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

**सर्वेक्षणात आढळून आलेले मुद्दे**

- माहिती संकलन झाल्यानंतर त्याचा अभ्यास करताना असे लक्षात आले की मतदारांच्या अपेक्षांच्या दृष्टीने प्राधान्य क्रमावर असलेले मुद्दे आणि त्यावर सरकारने तसेच विविध सरकारी संस्थांनी केलेले काम यामध्ये मोठी तफावत आढळून आली आहे.
- लोकप्रतिनिधी, सरकारी संस्था, यंत्रणा आदींनी नियोजन आणि देशातील नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेल्या मुद्यांवर कसे काम केले आहे याचे मूल्यमापन माहितीच्या अभ्यासादरम्यान करण्यात आले आहे. याचबरोबर सरकार आणि सामाजिक संस्था यांचा धोरणांमधील बदल, पुराव्याधारीत वकीली आदी बाबतीत समन्वयाचा अभ्यासही यामध्ये करण्यात आले आहे. समाजात बदल घडवू इच्छिणा-या समाज घटकांसाठी हे मूल्यमापन पाया ठरू शकेल.
- महाराष्ट्रातील आमदारांना मतदारांकडून सरासरी 10 पैकी 5.28 गुण मिळाले आहेत.
- महत्त्वाच्या समस्यांना मतदारांनी 10 पैकी 7.52 गुण दिले आहेत. यामुळेच मतदारांनी मांडलेल्या समस्या आणि सरकारने तसेच आमदारांनी त्यासाठी केलेल्या कामांमध्ये खूप तफावत दिसून येत आहे.

**तक्ता क्र. 1**

| महाराष्ट्र | गुण (10 पैकी) |
|---|---|
| **महत्त्वाचे मुद्दे** | **7.52** |
| **आमदारांचे काम** | **5.28** |
| | |




मतदारांनी नमूद केलेले महत्वाचे मुद्दे -
मतदारांच्या प्रमुख समस्यांकडे लक्ष देत असताना पाणी, वीज, रस्ते, अन्न, शिक्षण, आरोग्य आदी 35 पर्याय त्यांना विचारण्यात आले होते. महिला सुरक्षा, भ्रष्टाचाराचा भस्मासूर, महागाई हे तीन मुद्दे राज्यात मतदारांच्या दृष्टीने कळीचे आहेत. या प्रमुख मुद्यांवर आमदारांनी केलेल्या कामांना मतदारांनी 10 पैकी 6 गुण दिलेत. राज्यातील एकूण समस्यांपैकी अशा काही समस्या आहेत की ज्यावर आपल्या आमदारांनी भर द्यावा असे मतदारांना वाटते.

**राज्यातील मतदारांच्या दृष्टीने पाच प्रमुख समस्या**

## तक्ता 2

| Top issues | Performance(on a scale of 10) |
|---|---|
| महिला सुरक्षा | 5.2 |
| भ्रष्टाचाराचा भस्मासूर | 4.68 |
| महागाई | 4.88 |
| कचरा व्यवस्थापन | 5.28 |
| कायदा आणि सुव्यवस्था | 5.66 |




## राज्यातील मतदार मतदान करताना काय विचार करतात

या सर्वेक्षणात मतदार मतदान करताना कोणत्या गोष्टी विचारात घेतो याचाही अभ्यास करण्यात आला. यात राज्यातील मतदार हे उमेदवाराची जात, पक्षा आदींपेक्षा त्याच्या विश्वासार्हतेला प्राधान्य देताना दिसतात. पक्षाचा मुख्यमंत्री पदाचा उमेदवार हा प्राधान्य क्रमात चौथ्या किंवा पाचव्या स्थानावर येताना दिसतो.

**तक्ता-3**

| | |
|---|---|
| उमेदवार | **82.72%** |
| उमेदवाराचा पक्ष | 75.82% |
| उमेदवाराची जात किंवा धर्म | 28.59% |
| पक्षाचा मुख्यमंत्री पदाचा उमेवार | 66.10% |
| पैसे, दारू आदीचे आमीष | 18.73% |
| उमेदवाराची विश्वासार्हता | **86.84%** |


Why People Vote
100.00%
90.00%
80.00%
70.00%
60.00%
50.00%
40.00%
30.00%
20.00%
10.00%
0.00%
82.72%
75.82%
28.59%
66.10%
18.73%
86.84%
The Candidate
Candidates Party
Candidate's Caste/ Religion
The Party's CM Candidate
Distribution of money, Liquor, Gifts
Trustworthiness